# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र. 217 /२०२४

**विषय : NAAC/NBA/AISHE/2F-12B इत्यादी प्रमाणपत्राबाबत...**

अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांचे मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन अनिवार्य करण्यात आलेले आहे. उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेचे जतन व संवर्धन व्हावे याकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाने नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करणेबाबत निर्देशित केलेले आहे. या अनुषंगाने मा.संचालनालयाने वेळोवेळी शासकीय/अशासकीय/अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करून घेणेबाबत निर्देशित केलेले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मधील पोटकलम ६ (क) मध्ये महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाची तरतूद नमूद केलेली आहे. तसेच मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथील याचिका क्र.५२८०/२०१५ मधील दि. १६/११/२०१६ च्या निकालातही नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाचे महत्व अधोरेखित केलेले आहे.

त्याचप्रमाणे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ होणे व शैक्षणिक गुणात्मक दर्जा वाढीसाठी नॅक मूल्यांकन वं पुनर्मूल्यांकन करून घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोग, संबंधित शिखर संस्था तसेच उच्चतर शिक्षण विभाग यांचेकडे अर्ज प्रस्ताव सादर करणेसाठी महाविद्यालयांना NAAC/NBA/AISHE/2F-12B इत्यादीसाठी प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रमाणपत्राची आवश्यकता असते. सदर प्रमाणपत्रासाठीची प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने सुरू करण्यात आलेली आहे.

तरी विद्यापीठाच्या **www.unipune.ac.in** या संकेतस्थळावर **BOD Online** लॉगीन करुन **Certificate for NAAC/NBA/AISHE/2F-12B** यामध्ये आवश्यक त्या प्रमाणपत्रासाठी पर्याय निवडून ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करावा.

(गिरीश बैत) 20/9/24
(उपकुलसचिव, संलग्नता कक्ष)

गणेशखिंड, पुणे–४११ ००७
जावकक्र. : सीए/ 1919
दिनांक: 20 सप्टेंबर, २०२४

प्रत,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ